**नि. फौ. खटला क्र.४७/२०२०**
**निशाणी क्र.६२**

:: **आरोपीकरिता विधीज्ञ श्री. एम.बी. बिरादार यांच्यामार्फत शपथेवर उलटतपास सुरू** ::

०२. माझे शिक्षण झालेले नाही. मला फक्त सही करता येते. मला दोन मुली व एक मुलगा आहे. माझ्या घराच्या सूर्य उगवत्या दिशेला आरोपीचे घर आहे. माझ्या घरातून बाहेर येताना उजव्या हाताला आरोपीचे घर आहे. आरोपीच्या घराची जागा २० x ४२ फूट असल्याचे व त्यांचे बांधकाम २० x ३९ फूट असल्याचे मला माहीत नाही.

प्रश्न – आरोपींनी तुमच्या जागेपासून तीन फूट जागा सोडून बांधकाम केलेले आहे ?

उत्तर – आमच्यामध्ये पूर्वीपासून मोकळी जागा आहे.

०३. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या घरापुढे मैदान आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या घरासमोर रस्ता व त्यानंतर सांडपाण्याचा नाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या घरातील सांडपाणी सदर नाल्याने वाहत जाते. आमचा आरोपीसोबत जागेचा वाद नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ व ३ हे पुणे येथे राहतात. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.४ घटनेच्या वेळी आजारी होती व शरीराने थकली होती. साक्षीदार स्वत:हून सांगते की, मागच्या दोन वर्षापासून आरोपी क्र.४ आजारी आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ म्हातारे आहेत.

०४. दिलीप माने हे माझ्या गावातील ईसम आहेत. माझ्या घरापासून त्यांचे घर लांब अंतरावर आहे. देवणी ते लासोणा यामधील अंतर चार ते पाचा किलोमीटर असेल. लासोणा येथून देवणीला येण्यास दहा ते पंधरा मिनीट लागतात. माझ्या गावातून देवणीला येण्यासाठी वाहने आहेत. पोलिसांनी माझा जबाब घेतला होता. आरोपी क्र.१ ते ४ हे

धिंगाना घालत होते याबाबत मी पोलिसांना सांगितले होते. आता मला जबाब वाचून दाखविला. त्यामध्ये सदर मजकूर लिहिलेला नाही. पोलिसांनी सदर मजकूर न लिहिण्याचे कारण मी सांगू शकत नाही.

०५. माझ्या घरासमोर रस्ता आहे व त्याच्या बाजूला नाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नाल्यात पडली आणि मला दुखापत झाली. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर दुखापतीचा गैरफायदा घेऊन खोटी खबर दिली आणि खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीची जागा हडप करण्यासाठी व आरोपी क्र.२ व ३ यांना त्रास देण्यासाठी खोटी केस केली आणि खोटे प्रमाणपत्र प्राप्त केले. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये नमूद घटनेच्या अनुषंगाने खोटे कथन केले.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत | सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे ) | ( श.अ. सुरजुसे )

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**. | न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.

दि. ३१/१०/२०२५.